मुंबई : विशेष प्रतिनिधी

सरासरी २ चटई क्षेत्र निर्देशांकासह २२.५ टक्के विकसित जमीन मोबदला म्हणुन स्वीकारणे, बाधित झालेल्या राहत्या घरांच्या पाया क्षेत्राच्या तिप्पट जमीन अधिक प्रति चौरस फुटास एक हजार रुपये बांधकाम खर्च, यासह विमानतळ कंपनीचे प्रतिकुटुंब १०० समभाग या अतिशय आकर्षक व ऐतिहासिक पॅकेजला सोमवारी (दि. ११) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रकल्पग्रस्तांनी मान्यता दिल्याने या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत याबाबत सहमती झाली.

या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, ठाण्याचे पालकमंत्री गणेश नाईक, नगरविकास राज्यमंत्री उदय सामंत, लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संदीप नाईक, विवेक पाटील, सिडकोचे अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया, सिडकोचे संचालक नामदेव भगत, आर. सी. घरत तसेच सिडकोचे व वरिष्ठ शासकीय अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत २२.५ टक्के विकसित जमीन सरासरी २ चटई क्षेत्र निर्देशांकासह देण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या प्रस्तावाला प्रकल्पग्रस्तांच्यावतीने त्यांच्या उपस्थित नेत्यांनी मान्यता दिली. ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित होणार आहे, त्यांना प्रचलित धोरणानुसार१२.५ टक्के विकसित जमीन व त्यावर १.५ चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात येणार आहे. याशिवाय सिडकोच्यावतीने १० टक्के अतिरिक्त जमीन २.५ चटई क्षेत्र निर्देशांकासह देण्यात येणार आहे. अशाप्रकारे एकूण २२.५ टक्के जमिनीवर सरासरी २ चटईक्षेत्र निर्देशांक देण्यात येईल. ही सर्व जमीन अत्याधुनिक सोयीसुविधायुक्त असेल व ती प्रस्तावित विमानतळानजिक, वाणिज्यीकदृष्टया अतिशय महत्वाच्या ठिकाणी पुष्पकनगर या नावाने वसविण्यात येईल. हा प्रस्ताव मान्य नसणाऱ्या प्रकल्पबाधितांना केंद्राच्या जमिन अधिग्रहणाच्या नवीन कायद्यानुसार मोबदला घेण्याची मुभा असेल, असे बैठकीत ठरले.

ज्यांची राहती घरे या प्रकल्पात जात आहेत, अशा निव्वळ विमानतळ क्षेत्रातील (कोअर एअरपोर्ट एरिया) स्थलांतरित होणाऱ्या १० गावांमधील प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या स्वत: रहात असलेल्या घराच्या पाया क्षेत्राच्या तिप्पट क्षेत्राचा विकसित भूखंड देण्यात येणार आहे. यासाठी ४० चौ.मी.ची किमान मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. कमाल मर्यादा लवकर निश्चित करण्यात येईल. नवीन घरासाठी लागणारा बांधकाम खर्च १०००रूपये प्रति चौरस फुट याप्रमाणे देण्यात येईल. निव्वळ विमानतळ क्षेत्रातील सर्व घरांना हे धोरण लागू असेल. गावठाण क्षेत्रापासून २०० मीटर परिघापर्यंतच्या घरांपुरती असलेली यासाठीची पूर्वीची प्रस्तावित मर्यादा काढण्यात आली आहे. निवासी क्षेत्राच्या १५ टक्के व्यावसायिक वापर करता येईल. चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात येईल. याचबरोबर प्रत्येक प्रकल्प बाधित अविभक्त कुटुंबाला १० रूपये दर्शनी मूल्याचे १०० शेअर्स सिडकोच्यावतीने मोफत देण्यात येतील.

आजच्या निर्णयामुळे प्रकल्पग्रस्तांनी संयुक्त सर्वेक्षणास मान्यता दिली आहे. सर्वेक्षणाचे काम लवकरच सुरू होईल. प्रकल्पग्रस्तांच्या अन्य प्रलंबित प्रश्नांसंदर्भात प्रत्येक आठवड्याला आढावा बैठक घेऊन तोडगा काढण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना दिले. देशात प्रथमच इतके आकर्षक भूसंपादन, पुनर्वसन व पुन:स्थापना पॅकेज घोषित करण्यात आले असून प्रकल्पामध्ये प्रकल्पबाधितांची भागीदारीही होत आहे.

प्रस्तावित नवी मुंबई विमानतळाचा प्रश्न गेल्या ८–१० वर्षांपासून प्रलंबित होता. आता हा प्रश्न मार्गी लागल्याने हे विमानतळ झाल्यावर दरवर्षी सुमारे १०कोटी हवाई प्रवाशांची सोय होणार असून देशातील महानगर शहरांमधील सर्वात मोठे ग्रीनफिल्ड विमानतळ ठरणार आहे.

प्रकल्पग्रस्तांचे समाधान झालेच पाहिजे

अतिमहत्त्वाचा प्रकल्प असलेल्या नवी मुंबई विमानतळासाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी प्राधान्य दिले. असे करीत असताना प्रकल्पग्रस्तांचे समाधान झालेच पाहिजे, ही मुख्यमंत्र्यांची भुमिका स्वागतार्ह आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सरकारने सकारात्मक भुमिका घेतली आहे. तसेच जेएनपीटी आणि सिडको प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत महिनाभरात तोडगा काढण्याचेही ठरले आहे. त्यामुळे सरकारने नवी मुंबई विमानतळाच्या प्रकल्पासाठी देऊ केलेल्या प्रस्तावाला प्रकल्पग्रस्त नेत्यांनी मान्यता दिली असून, हा प्रकल्प होण्याच्या दृष्टीने चांगले वातावरण तयार झाले आहे.

– प्रशांत ठाकूर,
आमदार पनवेल विधानसभा

अन्य प्रश्नही मार्गी लागावेत

नवी मुंबई विमानतळ प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न अनेक वर्षांपासून रखडलेला होता. या प्रकल्पासाठी आमची सकारात्मक भूमिका होती. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही त्यास प्राधान्य दिल्याने तोडगा दृष्टीपथात आला आहे. जेएनपीटी आणि सिडको प्रकल्पग्रस्तांच्या अन्य प्रलंबित प्रश्नांबाबत दिलेल्या वेळेप्रमाणे सिडकोने तोडगा काढण्याची गरज आहे.

– आर. सी. घरत
(सल्लागार, नवी मुंबई विमानतळ प्रकल्पग्रस्त समिती)

महत्वाचे मुद्दे

विमानतळाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या गेलेल्या जमीनीच्या बदल्यात साडे बावीस टक्के जमीन मोबदल्याच्या स्वरुपात मिळणार आहे.

पहिल्या साडेबारा टक्के जमिनीला दीड एफएसआय तर त्यापुढच्या १० टक्के जमिनीला अडीच एफएसआय दिला जाणार आहे.

सध्या प्रकल्पग्रस्त राहत असलेल्या घराच्या तीप्पट जागा पुनर्वसन केल्या जाणाऱ्या गावठाणात त्यांना दिली जाईल.

प्रकल्पग्रस्तांनी आधी ४० टक्के विकसित जागा मागितली होती. त्यानंतर ते ३५ वर अडून होते पण, नव्या भूमी अधिग्रहण कायद्यापेक्षा चांगलं पॅकेज देत असल्याचा दावा करत सरकारने साडेबावीस टक्के जमिनीचा पर्याय त्यांना दिला.

सरकारचं नवं पॅकेज मान्य करत प्रकल्पग्रस्तांनी विमानतळाचा विरोध मागे घेतला आहे.